## मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क. (५७)/१३३/२००४

परिपत्रक

संचालक / विविध विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्राचार्य / संचालक मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था आणि प्राचार्य कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये / संस्था तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग व उपकुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मुंबई ४०००३२
दिनांक २ एप्रिल २००४

कुलसचिवांकरिता

---

क्रमांक:उशिसं / अनुगेप / २००३-२००४ / प्रशा-२
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)महाराष्ट्र राज्य,
पुणे -१ दिनांक २८.०९.२००४.

परिपत्रक :-

विषय :-महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या अहवालावरील शिफारशींबाबत....

संदर्भ :-शासन परिपत्रक क्र. बीसीसी / २००२ / १५५२ / प्र.क्र.६५ / २००२ / १६-ब दि. ०१.१०.२००३.

वरील विषयास अनुसरुन शासनाने श्री. लाड व श्री. पागे समितीने मेहतर / वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक अर्हता व सामाजिक उन्नतीसाठी शिफारशी केलेल्या आहेत, त्याअनुषंगाने शासनाने संदर्भिय परिपत्रक जारी केले आहे, सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

उच्च शिक्षण विभागांतर्गत अशासकीय,शासकीय महाविद्यालये तसेच अकृषि विद्यापीठातील संबंधीत आस्थापना प्रमुखांनी सदर परिपत्रकामध्ये निर्देशित केलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. याबाबतीत कोणत्याही प्रकारची टाळाटाळ अथवा दिरंगाई होणार नाही, याची खबरदारी घ्यावी व संबंधितांनी तसा पूर्तता अहवाल या संचालनालयास सादर करावा.

सही/-
(डॉ. एस.एन.पठाण)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत, सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे,
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक,महाराष्ट्र राज्य.
श्री. वासुदेवरावजी नागर,राष्ट्रीय अध्यक्ष,
अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस याना माहितीसाठी सादर.

महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९
च्या अहवालावरील शिफारशीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००२/१९०२/प्र.क्र.९५/२००२/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १/१०/२००३

संदर्भ : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७५/
३७८/(ओ)११/सोळा, दिनांक १९ नोव्हेंबर, १९७६.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७७/
९५२२/सोळा, दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७.

शासन परिपत्रक

श्री. लाड व पागे समितीने मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शिफारशी केलेल्या आहेत त्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग व नगर विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आदेशांचे / सूचनांचे शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा/मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/अनुदानित संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी या आदेशांची/सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत अनास्था दाखवित आहेत. ही बाब निश्चितच गंभीर स्वरूपाची असल्याने याबाबत शासनाने गंभीर दखल घेतलेली आहे.

२. महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने विचार करून खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(अ) लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय / निमशासकीय मंडळ / महामंडळ / स्वायत्त संस्था / महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादिंच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवा भरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

(ब) शासकीय / निमशासकीय कार्यालयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील मेहतर-वाल्मिकी, भंगी या जातीच्या उमेदवारांची त्यांच्या जातीचा विचार करून नव्हे तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांना नेमणूक करण्यात येईल, यासंबंधी विशेष खबरदारी घेण्यात यावी.

(क) मेहतर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींची अनुसूचित जातीकरिता वर्ग - ४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. त्यांची सरळ सेवेने भरती करावी. मेहेतरांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शविलेल्या वर्ग चारच्या आकड्यांमध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणपत्रात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आले पाहिजेत. वर्ग चार संबंधातील आकड्यांमध्ये मेहेतरांची संख्या समाविष्ट नाही अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणाच्या शेवटी निर्दिेशपूर्वक समाविष्ट करण्यात आली पाहिजे.

(ड) महतर,वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशीवर समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रिडा व पर्यटन विभाग,उद्योग,उर्जा व कामगार विभाग आणि नगर विकास विभाग यांनी वेळोवेळी शासन निर्णय/शासन परिपत्रक इत्यादींव्दारे आदेश/सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यांचे पालन सर्व शासकीय,निमशासकीय कार्यालये, तसेच मंडळे, महामंडळे यांनी ही करावी.

(इ) महतर,वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशांचे/सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासकीय / निमशासकीय/ महानगरपालिका/नगरपालिका/स्वायत्त संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी हेतुपुरस्सर टाळाटाळ,कुचराई करतील त्यांच्या विरूद्ध सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०९३/६३७/१६-ब, दिनांक १२ जून,१९९५ अनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, वर उल्लेखिलेले आदेश त्यांच्या अधिपत्याखालील/प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना, कार्यालय प्रमुखांना, महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषद/मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/अनुदानित संस्था इत्यादींच्या निदर्शनास आणण्यात यावेत.

४. याबाबत मंत्रालयीन विभागाने केलेली कार्यवाही निर्गमित केलेले आदेश, सामान्य प्रशासन विभागास कळविण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चारुशीला सोहोनी
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा,मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
सर्व आयुक्त, महानगरपालिका,

आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे,
आयुक्त, सेवायोजन, मुंबई,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,
पत्राने .